**<u>दिनांक २७/११/२०१९ रोजी शपथेवर पुढील सरतपास सुरु</u>**
**<u>फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.देवूसकर यांचेमार्फत</u>**

११. माझा जेसीबी भाडयाने देणेची सारा एजन्सी आहे. मी जेसीबी भाडयाने दिल्यानंतर भाडेपोटी आलेल्या पैशाबद्दल जी पावती देतो त्याचे मुळ पावती पुस्तक मी आज रोजी हजर केले आहे. या पावती पुस्तकामध्ये माझ्या सारा एजन्सीचे नाव तसेच जेसीबी कधी भाडयाने दिला आणि काम कधी बंद झाले तसेच एकूण तास व भाडयाची रक्कम लिहीलेली असते. या पावतीवर भाडयाची रक्कम स्विकारणार म्हणून सारा एजन्सीकरीता माझी सही असते. आरोपीने माझेकडून जेसीबी भाडयाने घेतला होता आणि त्याबद्दल आरोपीने मला जी भाडयाची रक्कम दिली होती त्याबद्दल मी या पावती पुस्तकामधील क्र. ८४ वरील पावती आरोपीला दिली होती. मुळ पावती मी आरोपीला दिली होती. आता मला या पावती पुस्तकातील क्र. ८४ वरील पावतीची कार्बन कॉपी दाखविणेत आली. मी आरोपीला जी मुळ पावती दिली होती त्याची ही कार्बन प्रत आहे त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर बरोबर आहे. पावतीच्या कार्बन प्रतीस **<u>निशाणी क्र. ३०</u>** देणेत आली.

सरतपास संपला.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब ठेवणेत आला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2019.11.27 15:33:38 +0530

(आर.आर.बेडगकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.

दिनांकः—२७/११/२०१९